# सर्वशक्तीमान

परमेश्वराला आपण सर्वशक्तीमान म्हणतो. मानायला तर आपण परमेश्वराला सर्वशक्तीमान मानतो. परंतू परमेश्वर सर्वशक्तीमान आहे हे कशावरुन? हा प्रश्न आपण कधीच विचारात घेत नाही. वैज्ञानिकदृष्टीने विचार केला तर असे आढळून येईल की, जस जसे आपण स्थूल तत्वांकडून सुक्ष्म तत्वांकडे जाऊ तस तसे शक्तीचे प्रमाण वाढत जाते. पृथ्वी, आप, तेज, वायू आणि आकाश अशी पाच तत्वांची सृष्टीरचना आहे. पाच तत्वांचे पाच मूलभूत गुणधर्म आहेत. पृथ्वीचा गुण आहे "गंध", आप म्हणजेच पाणी आणि पाण्याचा गुण आहे "रस", तेज म्हणजेच अग्नि आणि अग्निचा गुण आहे "रुप", वायुचा गुण आहे "स्पर्श" आणि आकाशाचा गुण आहे "शब्द".

या पंचमहाभूतांमध्ये पृथ्वी सर्वात स्थूल असून तिच्यामध्ये पाचही गुण विद्यमान आहेत. पाण्यामध्ये पृथ्वीचा "गंध" हा गुण कमी होतो व त्यायोगे पाण्याची शक्ती पृथ्वीच्या तिप्पट होते. अग्निमध्ये गंध आणि रस हे दोन गुण नसतात त्यामुळे त्याची शक्ती पाण्यापेक्षा अधिक असते. वायूमध्ये गंध, रस आणि रुप हे तीन गुण कमी होतात व त्यामुळे त्याची शक्ती अग्निपेक्षाही विशाल असते. शेवटी राहते आकाश. आकाश तत्वामध्ये गंध, रस, रुप किंवा स्पर्श हे गुण उरत नाहीत त्यामुळे त्याची शक्ती आणखी प्रचंड होते. आकाशाने सगळ्या सृष्टीला आपल्या कवेत घेतले आहे. त्यामुळे काही लोक या आकाशालाच परमात्म्याचा दर्जा देतात. परंतू विशाल शक्तीचा स्वामी असलेले आकाश सुद्धा परमात्मा नव्हे.

आपल्या इंद्रियांना अवगत होणारी व अनुभवास येणारी ही पंचमहाभूते त्यांच्या गुणानुरुप विविध प्रकारच्या शक्ती धारण करतात. आपण पाहिले की जस जसे एक एक गुण कमी होत जाईल तस तसे शक्तीचे प्रमाण वाढत जाते. परमात्मा तर निर्गुण आहे, गुणातीत आहे. परमात्मा गुणांच्या पलिकडे असल्या कारणाने सुक्ष्मातिसुक्ष्म असून विशालातीविशाल आहे. म्हणूनच तो सर्वशक्तिमान आहे.

अशा या सर्वशक्तिमान गुणातीत भगवंताचे वर्णन संपूर्ण अवतारवाणीमध्ये शहंशाह बाबा अवतारसिंहजी महाराज करतात. ते लिहितात-

**सर्वोत्तम दरबार तुझाची महिमाही तव अपरंपार |**
**गुणातीता तव कृपाही तैशी सर्व गुणांचे तू भांडार || - पद क्र.267**

खरं तर परमेश्वराच्या सत्तेशिवाय झाडाचे पानही हालत नाही. चराचरामध्ये तो परमात्माच व्यापून राहिला आहे. किंबहुना हा परमात्मा सर्वशक्तिमान आहे हे जाणूनच संत महात्मे त्याच्या चरणी लीन झाले. संतश्रेष्ठ नामदेव महाराज एका अभंगामध्ये लिहितात की,

**तुझिया सत्तेने वेदांशी बोलणे | सूर्याशी चालणे तुझिया बळे |**
**ऐसा तू समर्थ ब्रह्मांडाचा धनी | वर्म हे जाणूनी शरण आलो |**
**मेघांनी वर्षावे, पर्वती बैसावें | वायूने विचरावे सत्ते तुझे |**
**नामा म्हणे काडी न हाले साचार | प्रभू तू निर्धार पांडुरंगा |** - 461 (नामदेव गाथा)

मग अशा सर्वशक्तिमान देवाच्या भेटीची आस आमच्या हृदयात जागायला नको का?

- स.वि.लव्हटे